**नाशिक महानगरपालिका ,नाशिक**
**महिला व बालकल्याण विभाग**
**ई कोटेशन नोटीस सुचना**

**कामाचे नाव :-** वंचित बालक मेळावा दिनांक ०६ मार्च २०२४ रोजी आयोजित कार्यक्रमाकरीता स्कुल बॅग पुरविणेबाबत.

नाशिक महानगरपालिकेतर्फे वंचित बालक मेळावा दिनांक ०६ मार्च २०२४ रोजी आयोजित कार्यक्रमाकरीता उत्तम दर्जाच्या स्कुल बॅग पुरविणे करीता सर्व करांसह कोटेशन व्दारे उत्पादक, अधिकृत वितरक, विक्रेते यांचेकडुन कोटेशन पध्दतीने खालील प्रमाणे वस्तु दर मागविण्यात येत आहे.

| अ.न. | तपशिल | वर्णन | मागणी नग संख्या (अंदाजित) |
|---|---|---|---|
| १) | स्कुल बॅग लहान साईज (उत्तम दर्जा) | बालवाडी ते इयत्ता ०४ पर्यंतचे शिक्षण घेत असलेले विद्यार्थ्यांकरीता<br>१६/१२/६ इंच (जवळपास), वॉटरप्रुफ फॅब्रीक<br>(ब्लॅक / ब्राऊन / ग्रे / ब्लू कलर/ रेड इ. ) | ४०० |
| २) | स्कुल बॅग मोठी साईज (उत्तम दर्जा) | इयत्ता ०५ पासुन पुढे शिक्षण घेत असलेले विद्यार्थ्यांकरीता<br>१८/१३/७ इंच (जवळपास), वॉटरप्रुफ फॅब्रीक<br>(ब्लॅक / ब्राऊन / ग्रे / ब्लू कलर/ रेड इ. ) | ६०० |

**अटीशर्ती**

१. वरील कामाचे कोटेशन पत्रक अटीशर्ती सह www.nmc.gov.in या संकेत स्थळावर दिनांक २९/०२/२०२४ ते दिनांक ०५/०३/२०२४ रोजी दुपारी १२:०० वाजेपावेतो उपलब्ध आहे.
२. कोटेशन पाकीट सादर करणेची अंतिम तारीख दि. ०५/०३/२०२४ रोजी दुपारी २:०० वाजेपर्यंत राहील. मुदतीनंतर प्राप्त होणारी कोटेशन पाकीटे स्विकारली जाणार नाही.
३. कोटेशन पाकीट महिला व बालकल्याण विभाग राजीव गांधी भवन शरणपुर रोड नाशिक येथे स्विकारण्यात येतील.
४. सदर सदरच्या कामाकरीता वेगळा वाहतूक खर्च देण्यात येणार नाही.
५. सदरचे दरपत्रक हे सर्व करासह अनुषंगीक खर्चासह दर नमुद करायचे आहे. कोणत्याही कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही.
६. कोटेशन धारकाने दोन लिफाफे देणे आवश्यक आहे. १) तांत्रिक लिफाफा या लिफापयात पॅनकार्ड, शॉप अॅक्ट लायसन्स, GST नोंदणी प्रमाणपत्र, जोडणे आवश्यक आहे. त्या शिवाय कोटेशनचा विचार केला जाणार नाही. तांत्रिक लिफाफा पात्र असल्यावरच वित्तिय लिफाफा उघडण्यात येईल.
७. वित्तिय लिफाफा---- दर पत्रक आवश्यक
८. निवडण्यात आलेल्या कोटेशन धारकास र.रु. ३०,४५०/- (प्राकलनाच्या एकूण रक्कमेच्या ) ५% सुरक्षा अनामत भरावी लागेल.
९. कोटेशन स्विकारणे / नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहील.

**Sd/-**
**उप आयुक्त (समाज कल्याण)**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

# नाशिक महानगरपालिका, नाशिक
# महिला व बालकल्याण विभाग
# ई कोटेशन सुचना

**कामाचे नाव :-** वंचित बालक मेळावा दिनांक ०६ मार्च २०२४ रोजी आयोजित कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांकरीता स्कुल बॅग पुरविणेबाबत.

## <u>सर्व साधारण अटी -शर्ती</u>

१) कोटेशन सोबतची कोटेशनधारकाची कोणतीही अट मान्य करता येणार नाही. सशर्त कोटेशन तात्काळ रद्द करण्यात येईल .

२) कोटेशन नोटिस मध्ये नमुद स्कुल बॅगची संख्या ही अंदाजे असुन त्यामध्ये कामाचे अनुषंगाने कमी जास्त होण्याची शक्यता आहे. निवडण्यात आलेल्या कोटेशन धारकास त्याप्रमाणात पुरवठा करणे बंधनकारक राहील. अंदाजापेक्षा कमी बॅगची संख्या लागल्यास तेवढाच पुरवठा स्विकारण्यात येईल व उर्वरीत स्कुल बॅग परत करण्यात येतील. त्यासाठी कोणतीही भरपाई कोटेशन धारकास मिळणार नाही तसेच अंदाजापेक्षा अधिक स्कुल बॅगची आवश्यकता भासल्यास त्याच दरात पुरवठा करणे बंधनकारक राहील.

३) दिलेल्या मुदतीमध्ये संपुर्ण काम करणे / सेवा पुरविणे आवश्यक आहे काही अपरिहार्य कारणास्तव काम पुर्ण करणे शक्य नसल्यास तशी मुदतवाढ मिळणेबाबतचा आगाऊ अर्ज करणे आवश्यक राहिल. तथापी मुदतवाढ द्यावयाची किंवा कशी या बाबत महापालिकेचा निर्णय अंतिम राहील .

४) ज्यांचे कोटेशन दर मंजुर होईल त्या कोटेशनधारकास महानगरपालिकेचे लाभात र. रु. ५२०/- चे जनरल स्टँपपेपरवर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल. तसेच एक सक्षम जामीनदार द्यावा लागेल.

५) जी.एस.टी करासह व अनुषंगीक खर्चासह कोटेशन दर नमुद करावयाचे आहे. कोणत्याही टॅक्सची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही .

६) मुदतीत काम न केल्यास / सेवा न पुरविल्यास अशा उशिरा केलेल्या कामावर / सेवा पुरविण्याच्या रकमेवर महानगरपालिकेचे झालेले नुकसान विचारात घेऊन दंड आकारणी करण्यात येईल व सदरची रक्कम कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल .

७) सदरचे मंजुर दराने कराराचे मुदतीपर्यंत वेळोवेळी गरजेनुसार कामकरणे/सेवा पुरविणे बंधनकारक राहील.

८) मुदतीत काम न झाल्यास/ /सेवा न पुरविल्यास /मुदतीत काम पुर्ण न केल्यास,सदरचे काम कोटेशनधारकाचे जबाबदारीवर इतर ठिकाणाहुन करुन घेण्यात येईल आणि त्या कामी महानगरपालिकेस मंजुर दरापेक्षा जास्त खर्च आल्यास तो कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल .

९) मंजुरीनुसार काम न झाल्यास / सेवा न पुरविल्यास,काम/ सेवा नाकारण्यात येईल व त्याबाबतचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील .

१०) कोणतेही काम मंजुर केलेल्या दराने कोटेशनधारकाकडुन करण्याची महानगरपालिकेवर सक्ती नाही. याबाबत कोटेशनधारकास नुकसानभरपाई मागता येणार नाही.

११) अटी /शर्तीमधील एखाद्या शर्तीबाबत काही सवलत देणे अथवा आवश्यक अशा काही जादा अटी घालण्याबाबत महानगरपालिकेस अधिकार राहील.

१२) कोटेशन दर मंजुर झालेनंतर सदरच्या कामाच्या दरात/सेवेच्या दरात काही वाढ झाल्यास वाढलेल्या दराप्रमाणे कोटेशनधारकास जादा पैसे मिळणार नाही .

१३) अटिशर्तीचा भंग केल्यास त्यांचे बिलातुन रक्कम जप्त करण्यात येईल.

१४) काही अपरिहार्य कारणास्तव देयके अदा करणेस उशिर झाल्यास त्यावर व्याज अनुज्ञेय राहणार नाही.

१५) GST नोंदणी प्रमाणपत्र शॉप अॅक्ट लायसन्स्, पॅन कार्ड, इ. कागद पत्रे स्व् साक्षंकित करुन कोटेशन सोबत जोडणे आवश्य्क आहे. त्याशिवाय कोटेशन विचारात घेतले जाणार नाही.

१६) कोटेशनमध्ये नमुद स्पेसिफिकेशनप्रमाणे उत्तम दर्जाच्या स्कुल बॅग दिनांक ०६ मार्च २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता पुरविणे बंधनकारक राहील. (दिनांक व वेळेत बदल करण्याचा अधिकारी निम्न स्वाक्षरीकार यांना असेल) त्या दर्जानुसार व वेळेवर पुरवठा न झाल्यास स्कुल बॅग न स्विकारता परत करण्यात येईल.

Sd/-
उप आयुक्त (समाजकल्याण)
नाशिक महानगरपालिका नाशिक

सदरचे अटि शर्ती मी वाचल्या असुन सदरच्या अटी शर्ती मान्य व कबुल असुन त्याप्रमाने सेवा पुरविण्यास / काम करण्यास मी तयार आहे. त्यासाठी स्वाक्षरी करत आहे.

निविदाधारकाची सही व शिक्का

# नाशिक महानगरपालिका,नाशिक
# महिला व बालकल्याण विभाग
# कोटेशन फॉर्म दर पत्रक

**कामाचे नाव:-** वंचित बालक मेळावा दिनांक ०६ मार्च २०२४ रोजी आयोजित कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांकरीता स्कुल बॅग पुरविणेबाबत.

कोटेशन सादर करण्याची अंतिम मुदत :- दि. ०५/०३/२०२४ रोजी दुपारी २:०० वाजेपर्यंत

कोटेशनधारकाचे नाव व पत्ता :- ---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------------

---------संपर्क क्रमांक (मोबाईल क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक) :--------------------------------------

उक्त प्रमाणे कामाचे अटीशर्ती नुसार वंचित बालक मेळावा दिनांक ०६ मार्च २०२४ रोजी आयोजित कार्यक्रमाकरीता उत्तम दर्जाच्या स्कुल बॅग पुरविणे करीता सर्व करांसह कोटेशन व्दारे उत्पादक ,अधिकृत वितरक, विक्रेते यांचेकडुन कोटेशन पध्दतीने खालील प्रमाणे वस्तु दर मागविण्यात येत आहे.

| अ.न | तपशिल | वर्णन | मागणी नग संख्या अंदाजित | प्रती नग दर(सर्व करांसह) | एकुण रक्कम (सर्व करांसह) |
|---|---|---|---|---|---|
| १) | स्कुल बॅग<br>लहान साईज<br>उत्तम दर्जा | बालवाडी ते इयत्ता ०४ पर्यंतचे शिक्षण घेत असलेले विद्यार्थ्यांकरीता<br>१६/१२/६ इंच (जवळपास), वॉटरप्रुफ फॅब्रीक<br>(ब्लॅक / ब्राऊन / ग्रे / ब्लू कलर/ रेड इ. ) | ४०० | | |
| २) | स्कुल बॅग<br>मोठी साईज<br>उत्तम दर्जा | इयत्ता ०५ पासुन पुढे शिक्षण घेत असलेले विद्यार्थ्यांकरीता<br>१८/१३/७ इंच (जवळपास), वॉटरप्रुफ फॅब्रीक<br>(ब्लॅक / ब्राऊन / ग्रे / ब्लू कलर/रेड इ. ) | ६०० | | |
| | | **एकुण** | **१०००** | | |

सदर कोटेशनसोबत असलेल्या सर्व अटी शर्ती मी वाचल्या असुन मला त्या मान्य आहेत. सदर अटी शर्ती प्रमाणे सदर कोटेशनमध्ये नमुद केलेल्या दराने उक्त वस्तु व सेवा पुरविणे / पुरवठा करण्यास मी तयार आहे. त्यासाठी या कोटेशनवर स्वाक्षरी करीत आहे .

दिनांक:-

ठिकाण:-

कोटेशन धारकाची सही व शिक्का